# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४७८**

**अपिलार्थी श्री. ईस्माइल दोस्त मोहम्मद बालोच**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (पी/उ-पूर्व)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता पी-उत्तर (पूर्व)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०९.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलदिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.११.२०२३ | १८.१२.२०२३ | ०२.०१.२०२४ | ०१.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०४.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १८.१२.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०१.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २८.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"Please provide me copy of withdrawal MRTP C.E.O. (SRA) Approval Remark dated 08.07.2021, for S. R. Scheme on plot of CTS No. 571, 571/1 to 19, 572/A, 572/1 to 156, 572/169 to 288, 572/293 to 295, 574, 574/1 to 11, 575, 575/1 to 15, 576, 576/1, 577, 577/1, and 572/C. situated Makrani Pada Co-Op. HSG. Society, Rani Sati Marg, Malad (E), Mumbai 400097."*

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.१२.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अभिलेख कक्षामध्ये शोध घेतला असता सदर नस्ती सापडली नाही. सदर नस्तीचा पुनश्च शोध घेण्यात येत असून ती प्राप्त झाल्यास आपणांस आवश्यक अभिलेख उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच या कार्यालयामार्फत नस्ती शोधण्याकरिता केलेल्या कार्यवाही छायांकित प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०२.०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अभिलेखावर उपलब्ध असल्यास १५ दिवसांत विनाशुल्क अपिलार्थींना देण्यात यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींनी मागितलेली माहितीचा शोध घेतला असता संबंधीत नस्ती उपलब्ध झालेली नाही व संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करावयाची नस्ती आहे.

जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत अभिलेख शोधून माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा संबंधीत अभिलेख गहाळ झाली असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियानुसार संबंधीत पोलीस ठाणे येथे नस्ती गहाळ झाल्याविषयी गुन्हा नोंदवून पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०६.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २५.०९.२०२५**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 25-9-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४७८**
**अपिलार्थी श्री. ईस्माइल दोस्त मोहम्मद बालोच**
**सुनावणी दिनांक : ०६.११.२०२५ (In continuation of order dt 25.09.2025)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अभिलेख शोधून माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा संबंधित अभिलेख गहाळ झाली असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियमानुसार संबधित पोलीस ठाणे येथे नस्ती गहाळ झाल्याविषयी गुन्हा नोंदवून पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०६.११.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर करुन नमूद केले की, In Compliance with the last hearing order directing initiation of action for missing file, a circular /letter dated 03.11.2025 has been issued by this office to the concerned Engineering and other relevant departments instructing them to search and trace the missing file paeprs related to the said matter. In the above circular a period of of 7 days has been provided to submit remarks and status of file tracing. It is further submitted that if no remarks are received within the prescribed period further necessary steps as per direction of the Hon'ble Commission will be initiated immediately thereafter. It is humbly submitted tat therw has been no deliberate or purposeful delay in this matter. The delay if any occurred due to engagement in court-related cases and urgent office works which required priority handling at that time.

आयोगाने दि. २५.०९.२०२५ रोजी दिलेल्या आदेशाची अनुपालन झालेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी जर संबंधित अभिलेख उपलब्ध होत नसेल तर यापूर्वी आदेशित केल्याप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख संबंधित पोलीस ठाणे येथे नस्ती गहाळ झाल्याविषयी FIR दाखल करुन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.११.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

(सही) 6-11-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**